दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक ३२९ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.२३ फेब्रुवारी २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com



# नागरिकांच्या आरोग्याचे रक्षण करणे आपले प्रथम कर्तव्य : मुख्यमंत्री उद्धव ठाकरे

## उसर येथील अलिबाग शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय प्रशासकीय इमारतीचे भूमीपूजन सोहळा संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

कोरोना अजून संपलेला नाही, मास्कची सक्ती कधी काढणार हा प्रश्न सातत्याने विचारला जातोय, मात्र आताच काही सांगता येत नाही. आता आपल्याला हा जो काळ मिळाला तो लसीकरण वाढविण्यासाठी उपयुक्त आहे. साथ शिखरावर असताना लसीकरण करणे कितपत योग्य हे डॉक्टर सांगतील परंतू आता लाट कमी होत असताना लसीकरण वाढविणे गरजेचे आहे. नागरिकांच्या आरोग्याचे रक्षण करणे, हे आपले प्रथम कर्तव्य असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज दूरदृष्यप्रणालीद्वारे केले. अलिबाग तालुक्यातील उसर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयाच्या प्रशासकीय इमारतीचा भूमीपूजन सोहळा दूरदृष्यप्रणालीद्वारे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते तर ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला, त्यावेळी ते बोलत होते.



अनेकांच्या अनेक मागण्या असतात. मात्र नुसत्या मागण्या करून काही होत नाही तर त्या मागण्यांच्या पूर्णत्वासाठी पाठपुरावा करावा लागतो. या जिल्ह्याच्या पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी या महाविद्यालयासाठी सातत्याने पाठपुरावा केला आणि त्या यशस्वीही झाल्या. मुंबई-पुण्याच्या सीमा लाभलेल्या या जिल्ह्याला भविष्यात चांगल्या आरोग्य सुविधा देण्याचा प्रयत्न निश्चित केला जाईल असे सांगून शेवटी ज्यांचे या रुग्णालय उभारणीस सहकार्य लाभले त्या सर्वांना धन्यवाद. या महाविद्यालयाची इमारत लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी सर्व प्रकारचे सहकार्य राज्य शासनाकडून दिले जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. **: उद्धव ठाकरे, मुख्यमंत्री**

यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे दूरदृष्यप्रणालीद्वारे तर महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, पालकमंत्री कु.आदिती तटकरे, आरोग्य मंत्री राजेश टोपे, वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख, जिल्हा परिषद अध्यक्षा श्रीमती योगिता पारधी, खासदार सुनिल तटकरे, आमदार बाळाराम पाटील, आमदार अनिकेत तटकरे, वैद्यकीय शिक्षण विभागाचे संचालक डॉ.दिलीप म्हैसेकर, जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधीक्षक अशोक दुधे, वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.महेंद्र कुरा, सहाय्यक अधिष्ठाता डॉ.गिरीष ठाकूर, सरपंच अनिता गोंधळी, जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुधाकर घारे, माजी आमदार सुरेश लाड, सभापती बबन मनवे, महेंद्र घरत, पदाधिकारी, विविध विभागांचे शासकीय अधिकारी आदी मान्यवर प्रत्यक्ष उपस्थित होते.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे पुढे म्हणाले की, लसीकरणानंतरही कोरोना लागण होते पण त्याची घातकता कमी होते, जीव वाचविण्याचे सुरक्षा कवच म्हणून लस महत्वाची आहे. गेल्या दोन वर्षात राज्यातील रुग्णालयांचे नूतनीकरण, नवीन रुग्णालयांचे उद्घाटन, श्रेणीवर्धनाचे जास्तीत जास्त काम महाराष्ट्रात झाले. आरोग्य सेवेला ब्रेक न लावता त्यात सातत्याने वाढ करावी लागली. संपूर्ण देशात महाराष्ट्र राज्याने या आव्हानात्मक परिस्थितीत आरोग्य सुविधांमध्ये प्रचंड वाढ केली. उद्योग–व्यवसायाचा विकास करताना निरोगी आरोग्याकडेही लक्ष देणे गरजेचे आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या रायगड जिल्ह्यात या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयाचे भूमीपूजन संपन्न होत आहे. शिवरायांच्या भूमीत आधुनिक सोयी सुविधा असलेले वैद्यकीय महाविद्यालय– रुग्णालय उभे करीत आहोत, त्याचबरोबर अपघातग्रस्त भागात ट्रॉमा केअर सेंटर उभे करीत आहोत, याचे समाधान वाटत आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार म्हणाले की, एका अत्यंत महत्त्वाच्या आणि मोठ्या प्रकल्पाची आज सुरुवात होत आहे. महाविद्यालय काढणे तशी अवघड गोष्ट नसते, मात्र वैद्यकीय महाविद्यालय काढणे ही अवघड गोष्ट आहे. कारण त्यासाठी कमीत कमी ५०० ते ७०० बेड्सचे हॉस्पिटल असावे लागते आणि वैद्यकीय कर्मचारी वर्ग व साधनसामग्री लागते. त्यात किमान ५०० कोटींची गुंतवणूक सुरुवातीला करावी लागते. ती गुंतवणूक केल्यानंतर महाविद्यालयासाठी वेगवेगळ्या सुविधा उभाराव्या लागतात. विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह, कर्माचाऱ्यांसाठी निवासस्थाने उभारावी लागतात. हे अवघड काम खासदार श्री.सुनील तटकरे, पालकमंत्री आदिती तटकरे, राज्य सरकार व सरकारमधील संबंधित मंत्री मिळून करीत आ–हेत. या सर्वांचे तसेच त्यांना सहकार्य करणाऱ्या स्थानिक नागरिकांचे मी अभिनंदन करतो. या जिल्ह्याचा चेहरामोहरा बदलण्यासाठी लोकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प त्यांनी हाती घेतला आहे. या सगळ्या संकटाच्या काळात आरोग्य कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता रात्रंदिवस काम केले. अनेकांनी आपले प्राण गमावले. पण महाराष्ट्राचे वैशिष्ट्य असे की, संकट आल्यानंतर लोक बाकी सगळं विसरून संकटावर मात करण्यासाठी काम करतात. तेच काम आज मला इथे होताना दिसत आहे. इथे वैद्यकीय महाविद्यालय आणि हॉस्पिटल उभारले जात आहे. महाविद्यालय सुरू होणार आहे, यासाठी ७६ विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रियाही पूर्ण केली आहे. ज्यांनी ज्यांनी या कामात पुढाकार घेतला, त्या सर्वांना मी अंतःकरणापासून धन्यवाद देतो, असे सांगून श्री.पवार पुढे म्हणाले, हा जिल्हा जागरूक जिल्हा आहे.




वेळप्रसंगी लोकांचे दुःख दूर करण्यासाठी कष्ट करणाऱ्यांचा हा जिल्हा आहे. उत्तम शेती आणि मत्स्य व्यवसाय करणाऱ्यांचा जिल्हा आहे. रायगड जिल्ह्याने अनेक संकटांवर आजवर मात केली आहे. नेतृत्वाची खाण असलेला हा जिल्हा आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेचा बारकाईने अभ्यास करणारे देशाचे पहिले अर्थमंत्री सी. डी. देशमुख देखील याच जिल्ह्याचे होते. सी.डी. यांच्यासारखेच नारायण नागो पाटील, बी.व्ही. पाटील, दत्ता पाटील अशी अनेक नावे यानिमित्ताने घेता येतील. अशा या जिल्ह्याची गरज लक्षात घेऊन राज्य सरकार आणि इतर सहकाऱ्यांनी वैद्यकीय महाविद्यालय उभारण्याचा निर्णय घेतला. एका ठरलेल्या काळात हा प्रकल्प पूर्ण होईल, अशी आशा करतो. या प्रकल्पाच्या माध्यमातून रुग्णांची सेवा करण्याचे महत्त्वाचे केंद्र बनेल. असे म्हटले जाते की, रुग्णसेवा ही ईश्वरसेवा असते. या माध्यमातून या वास्तूमध्ये ईश्वरसेवा घडेल, अशी अपेक्षा! **खा.शरद पवार**

पालकमंत्री कु.आदिती तटकरे म्हणाल्या की, रायगडकरांचे अनेक वर्षापासूनचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे स्वप्न पूर्ण होत असल्याचा आनंद आहे. सन २०१० मध्ये राज्याचे तत्कालीन अर्थमंत्री व विद्यमान खा. सुनील तटकरे यांनी या महाविद्यालयाची घोषणा केली होती. महाविकास आघाडीच्या सरकारमध्ये राज्यमंत्री व रायगड जिल्हा पालकमंत्री म्हणून पाठपुरावा करत असताना या महाविद्यालयाची स्वप्नपूर्ती करण्याची मला संधी मिळाली, याचा अभिमान आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अलिबाग सुरु करण्याकरिता राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकांची पूर्तता होण्याच्या दृष्टीने अलिबाग येथील जिल्हा सामान्य रुग्णालयाची जागा अपुरी असल्यामुळे राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड, थळ, अलिबाग यांनी केलेल्या सहकार्याबद्दल पालकमंत्री कु.तटकरे यांनी त्यांचे विशेष आभार मानले.

खासदार सुनील तटकरे यांनी आपल्या मनोगतातून रायगड जिल्ह्याची आरोग्य यंत्रणा सक्षम करण्यासाठी आपण कटिबद्ध असून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व मिळून येथील विकासकामे पूर्ण करू, अशी आशा व्यक्त केली. त्यांनी माणगाव येथील १०० खाटांचे विशेष रुग्णालय, ट्रॉमा केअर सेंटरला राज्य शासनाने दिलेल्या सहकार्याबद्दल शासनाचे विशेष आभार मानले. तसेच भविष्यात १०० खाटांचे आयुर्वेदीक रुग्णालय साकारण्यासाठीही शासनाचे पाठबळ मिळेल, अशी आशा व्यक्त केली.





शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या माध्यमातून उच्च गुणवत्तेचे वैद्यकीय शिक्षण व अत्याधुनिक आरोग्य सेवा उपलब्ध होणार आहे. वैद्यकीय शिक्षणामध्ये आपले भविष्य घडविणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना या महाविद्यालयातून यशस्वी वाटचाल करता येणार आहे. यावेळी आपल्या मनोगता-तून त्यांनी शासकीय महाविद्यालय सुरू करण्याच्या दृष्टीने केलेल्या प्रयत्नांविषयी थोडक्यात विवेचन केले. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर रायगडकरांची गेल्या अनेक वर्षांचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची स्वप्नपूर्ती झाली आहे. **: ना.आदिती तटकरे, पालकमंत्री**

## संक्षिप्त...

### समीर वानखेडे यांना दणका, मुंबई पोलिसांनी बजावले समन्स

**दै.रायगड नगरी । मुंबई**

बहुचर्चित IRS अधिकारी आणि NCB मुंबईचे माजी झोनल डायरेक्टर समीर वानखेडे यांना मुंबई पोलिसांसमोर हजर राहण्यासाठी समन्स बजावण्यात आले आहे. २३ फेब्रुवारी रोजी ठाण्यातील कोपरी पोलीस ठाण्यात बोलावण्यात आले आहे. बारचा परवाना घेऊन बनावटगिरी आणि फसवणूक केल्याप्रकरणी हे समन्स बजावण्यात आले आहे. या प्रकरणी यापूर्वीही त्याच्यावर एफआयआर दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी ठाणे जिल्हाधिकाऱ्यांनी नुकतेच नवी मुंबईतील बारचा परवानाही रद्द केला होता. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाविरोधात समीर वानखेडे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मुंबई उच्च न्यायालयाने वानखेडे यांच्या याचिकेवर सुनावणी घेण्यास नकार देत प्रक्रिया पूर्ण करण्यास सांगितले होते. मात्र, आज हायकोर्टाने २६ फेब्रुवारीपर्यंत अटक न करण्याचे ठाणे पोलिसांना निर्देश दिले आहेत. वय लपवून बारचा परवाना घेतल्याप्रकरणी समीर वानखेडेविरोधात मुंबई पोलिसांनी एफआयआर दाखल केला आहे. महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील कोपरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# राज्य सरकारी कर्मचारी दोन दिवसांच्या संपावर



**दै.रायगड नगरी । तळा**

राज्य सरकारी, निमसरकारी, शिक्षक–शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेने विविध प्रलंबित मागण्यांसाठी ता.२३ व ता.२४ फेब्रुवारी रोजी दोन दिवसाचे लाक्षणिक संप आंदोलन पुकारले आहे. यात सर्व कर्मचाऱ्यांनी सामील होण्याचे आवाहन राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना रायगड तळा शाखा अध्यक्ष भूषण पाटील यांनी केले आहे आज दि.२२ फेब्रुवारी रोजी तळा तहसीलदार अण्णाप्पा कनशेट्टी यांना निवेदन संघटनेच्या वतीने देण्यात आले.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पाठविलेल्या निवेदनात कर्मचारी संघटनेकडून कोरोना काळात राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी विविध पा–तळीवर संपूर्ण सहभाग घेवून सहकार्य केल्याचे नमुद केले आहे. सरकारने २००५ मध्ये जुनी पेन्शन योजना रद्द करुन नवीन अंशदायी पेन्शन योजना अंमलात आणली. परंतु कर्मचारी मागील अनेक वर्षापासून जुनी पेन्शन योजना पूर्ववत लागू करण्याची मागणी करत असताना याकडे सरकार दुर्लक्ष करत आहे. याबाबत गठीत अभ्यास समिती संथ गतीने काम करत आहे, असे निवेदनात म्हटले आहे. नवीन पेन्शन योजनेत केंद्राने ज्या सुविधा नमुद केल्या आहेत, त्याबाबत राज्य शासनाने कोणताच विचार केला नाही. या मुळे सध्या अर्धे कर्मचारी हवालदिल झाले आहेत. परिणामी राज्य सरकारी, निमसरकारी, शिक्षक–शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेने ता.२३ व ता.२४ फेब्रुवारी रोजी दोन दिवसाचे लाक्षणिक संप आंदोलन पुकारले आहे. यात सर्व कर्मचाऱ्यांनी सामील व्हावे, असे आवाहन राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेने केले आहे.

अशा आहेत मागण्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान .../२

# मोबाईल चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगारास गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलने केले गजाआड

## साडेचार लाखाचे मोबाईल हस्तगत

**दै.रायगड नगरी । पनवेल**



गुन्हे शाखा कक्ष २ पनवेल यांच्या कडून घरातील उघडे दरवाजे, तसेच शटर आणि गर्दीच्या ठिकाणाहून मोबाईल चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगारास अटक करण्यात आली आहे. अटक आरोपींकडून चार लाख पन्नास हजार रूपये किंमतीचे एकुण २८ मोबाईल हस्तगत करून नवी मुंबई, पुणे आयुक्तालयातील एकुण १० गुन्हे उघडकीस आणले आहेत.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील मोबाईल चोरीच्या गुन्हयांचे प्रमाण वाढल्याने पोलीस आयुक्त बिपीन कुमार सिंह, नवी मुंबई, सह पोलीस आयुक्त डॉ. जय जाधव, अपर पोलीस आयुक्त गुन्हे महेश घुर्ये, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, सुरेश मेंगडे, सहा. पोलीस आयुक्त गुन्हे शाखा विनायक वस्ते यांनी वेळोवेळी आढावा घेवून विशेष मोहिम राबवुन मोबाईल चोरी करणाऱ्या गुन्हेगारांच्या मुसक्या आवळुन वेळीच प्रतिबंध करण्याबाबत आदेश दिले होते. त्याअनुषंगाने .../२

# श्रीवर्धन तालुक्यातील भोस्ते गावामध्ये जमावाचा एका व्यक्तीच्या घरावर भीषण हल्ला

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन तालुक्यातील भोस्ते या गावामध्ये क्षुल्लक कारणावरून एका व्यक्तीच्या घरावरती गावकऱ्यांच्या जमावाने हल्ला केल्याची घटना घडली आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, रविवारी रात्री साडेनऊच्या सुमारास काही क्षुल्लक कारणावरून गावातील पंचवीस ते तीस व्यक्तींचा जमाव भोस्ते गावातील रहिवासी अरुण काशिनाथ चिमण यांच्या घरावरती चाल करून आला. आपल्या चुलत भावाच्या पडवीमध्ये गावातील काही मुले रात्री उशिरापर्यंत आरडाओरडा करीत असतात. यावरून अरुण चिमण यांनी त्यांच्या चुलत भावाला या ठिकाणी या मुलांना बसवू नकोस अशी समज दिली. या गोष्टीचा राग मनात धरून गावातील काही तरुण व्यक्तींनी अरुण चिमण यांच्या घरावर हल्ला केला. या हल्ल्यामध्ये घरातील खिडक्यांच्या काचेची तावदाने, त्याचप्रमाणे दरवाजे याच्यावरती लाथा मारून तोडफोड करण्यात आली. तसेच अरुण चिमण यांना देखील जबरी मारहाण करण्यात आली.

लाठीकाठी, सळ्या तसेच हाता बुक्क्यांनी मारहाण करण्यात आल्याचे अरुण चिमण यांनी प्रस्तुत प्रतिनिधीला सांगितले. यावेळी अरुण चिमण यांना वाचवण्यासाठी गेलेल्या त्यांच्या पत्नी त्याचप्रमाणे चार मुले यांच्यावरती देखील जमावाने हल्ला करून त्यांना देखील जखमी केल्याची घटना घडली आहे. यापैकी एका मुलीच्या बोटाला धारदार शस्त्राने जखम झाल्याने श्रीवर्धन येथील उपजिल्हा रुग्णालयांमध्ये टाके देखील घालण्यात आले होते. तर उर्वरित मुलांना जबरदस्त मुका मार लागला आहे. या घटनेनंतर अरुण चिमण यांनी श्रीवर्धन पोलीस ठाणे गाठले व त्या ठिकाणी असलेल्या ठाणे अंमलदारां जवळ झालेल्या घटनेची माहिती सांगितली. त्यानंतर ठाणे अंमलदार यांनी वैद्यकीय उपचार घेण्यासाठी त्यांना उपजिल्हा रूग्णालय श्रीवर्धन येथे जाण्यासाठी पत्र दिले व एका होमगार्ड सोबत त्यांना उपजिल्हा रूग्णालय श्रीवर्धन येथे पाठवण्यात आले. त्या ठिकाणी गेल्यानंतर उपस्थित डॉक्टरांनी केवळ एका मुलीच्या हाताला जखम झालेली असल्याने टाके घातले. उर्वरित कोणालाही तपासले देखील नाही. व अरूण चिमण व त्यांच्या पत्नी यांना १०८ क्रमांकाची रुग्णवाहिका बोलावून अलिबाग जिल्हा रुग्णालय येथे पाठवण्यात आले. जिल्हा रुग्णालय अलिबाग येथे उपचार घेतल्यानंतर अरुण चिमण यांनी श्रीवर्धन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल .../२

# क्षत्रप आणि सम्राट

राजीव गांधी यांच्या हत्येनंतर काँग्रेसचा क्रमाक्रमाने जो ऱ्हास होत गेला आणि भारतीय जनता पक्षाची उडी जेव्हा कमी पडत होती; तेव्हा रावपर्वानंतर देशाने एच. डी. देवेगौडा आणि इंदरकुमार गुजराल हे दोन अपघाती पंतप्रधान पाहिले. काँग्रेसला स्वत:ला सत्तेत येता येत नव्हते, तेव्हा काँग्रेसने विरोधकांचे अनेक पंतप्रधान मनमर्जीने घालवले आहेत. चंद्रशेखर आणि देवेगौडा यांची आठवण येथे अप्रस्तुत ठरू नये. या पार्श्वभूमीवर उद्या भाजपचा पराभव झाला तरी दुर्दैवाने काँग्रेस हा राष्ट्रीय पक्ष केंद्रात पर्याय देण्याच्या स्थितीत नाही. काही अघटित चमत्कार झाला तरच काँग्रेसला स्वबळावर २०२४ मध्ये दिल्लीचे सिंहासन मिळू शकते. यामुळेच, ज्यांना 'क्षत्रप' अशी प्राचीन संज्ञा आहे; असे विविध राज्यांचे नेते, मुख्यमंत्री व स्वयंघोषित संस्थानिक वेगवान राजकीय हालचाली करत आहेत. यात अर्थातच, ममता बॅनर्जी आघाडीवर होत्या. पण मुख्यमंत्रिपद मिळवल्यानंतर मुंबईत धडकणाऱ्या दीदी आज मागे पडलेल्या दिसतात. त्यांच्यानंतर आता तेलंगणमध्ये काँग्रेस व भाजप या दोघांनाही पाणी पाजणारे कलवकुंतल चंद्रशेखर राव मुंबईत येऊन थडकले. आंध्र प्रदेशातून तेलंगण हा स्वतंत्र प्रांत जन्माला घालण्याचे सर्वाधिक श्रेय दिवंगत एन. टी. रामाराव यांच्या या शिष्याला जाते. मूळ आंध्रमध्ये लोकसभेच्या ४२ जागा होत्या. आता आंध्र २५ आणि तेलंगण १७ असे विभाजन झाले आहे. दिल्लीच्या तख्तावर बसण्याचे स्वप्न पाहण्यासाठी १७ हा काही मोठा आकडा नाही. मात्र, अशी स्वप्न पाहणारे नेते आणि त्यांचे अनुयायी महाराष्ट्राला अपरिचित नाहीत. त्यांची संख्या वाढतेही आहे. केसीआर यांनी दिल्लीत राज्य करण्याचे आपले स्वप्न पूर्वी बोलूनही दाखविले होते आणि त्यात काही चूक नाही. प्रश्न इतकाच की, त्या सिंहासनाचे स्वप्न पाहणारे डझनभर क्षत्रप आज आहेत. केसीआर यांच्या राजकीय व्यूहरचनेचा भाजपविरोध सरळ दिसणारा आहे. ते गेल्या काही दिवसात नवीन मित्रांप्रमाणे शिवराळ नसली तरी अतिशय कडक टीका भाजपवर वारंवार करीत आहेत. त्यातही, भाजपच्या विरोधात गेलेली शिवसेना जशी हिंदुत्ववादी आहे; तसेच, केसीआर हेही हिंदुत्ववादी आणि धर्मभोळेही आहेत. त्यांचे धार्मिक अनुष्ठानांतील सोवळ्यातले फोटो किंवा 'आमचे हिंदुत्व त्यांच्यापेक्षा वेगळे आहे,' अशी विधाने यांची तेलंगणाला सवय आहे. त्यांच्या हालचालींना असणारा भाजपविरोधाचा रंग जितका स्पष्ट आहे; तितकाच, त्यांचा काँग्रेसविरोधही कडवट होत चालला आहे. त्यामुळेच, ते मुंबईत पोहोचताच तेलंगणातील काँग्रेस नेत्यांनी त्यांची संभावना 'भाजपची बी टीम' अशी केली. तेलंगणात राव यांनी काँग्रेसची केवळ कोंडी केली नाही तर तो पक्ष साफ करण्याचा चंग बांधला आहे. केसीआर यांची मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्याशी झालेली भेट व चर्चा याकडे या दृष्टीतून पाहायला हवे. उद्याच्या राष्ट्रीय सत्ताकारणात महाराष्ट्र हे उत्तर प्रदेशाचा खालोखाल महत्त्वाचे राज्य आहे. महाराष्ट्राची आर्थिक ताकद आणि मुंबईचे अनेक अर्थांनी अनन्य स्थान यांची तर कुठल्याही राज्याशी तुलनाच होऊ शकत नाही. त्यामुळे, ममता आणि केसीआर यांच्या भेटींनंतर उद्या इतरही क्षत्रपांची मुंबईकडे रीघ लागली तर आश्चर्य वाटायला नको. शिवसेनेने ज्या पद्धतीने भाजपला रामराम ठोकून मुख्यमंत्रिपद मिळवले आणि आता रोजच्या रोज भाजपला अंगावर घेण्याचा कार्यक्रम चालविला आहे; तो पाहता इतर राज्यांच्या नेत्यांना शिवसेनेचे आकर्षण वाटले तर नवल नाही. त्यामुळे, आजवर विरोधी ऐक्याचे शिल्पकार म्हणून ज्यांच्याकडे सदैव पाहिले गेले, त्या शरद पवार यांचीही जागा उद्धव ठाकरे यांनी घेतली तर नवल वाटायला नको. केंद्रात कुणाचीही सत्ता असली तरी 'आपण बरे आणि आपले राज्य बरे', अशी भूमिका उडिशाचे नवीन पटनायक घेत आले आहेत. तमिळनाडूचे स्टॅलिन, आंध्रचे जगनमोहन रेड्डी हेही केंद्राशी थेट संघर्ष करण्याच्या मनस्थितीत सध्या तरी दिसत नाहीत. या तीन प्रभावी मुख्यमंत्र्यांना विरोधकांची संभाव्य आघाडी आपलेसे करते का, हेही पाहावे लागेल. केसीआर यांचे राजकीय गुरू एनटीआर यांनी विरोधकांचा एक महामेळावा हैदराबादेत यशस्वी केला होता. विरोधकांच्या राजकीय हालचालींचे गणित आता पाच राज्यांच्या आणि त्यातही उत्तर प्रदेशाच्या विधानसभा निकालांवर अवलंबून असेल, हे तर उघडच आहे. महाराष्ट्रापुरते बोलायचे तर शिवसेनेला मुंबई महापालिका राखता येते का, हे महत्त्वाचे ठरणार आहे. सगळ्याच छोट्या-मोठ्या क्षत्रपांना एक दिवस अभिषिक्त सम्राट बनायचे असते. त्यासाठी, इतर क्षत्रपांशी दोस्ती आणि सुप्त स्पर्धा हे एकदमच चालू असते. तोच खेळ चालू झाला आहे. तो दिवसेंदिवस रंगतदार बनत जाईल.

# रिलायन्सच्या नियोजित सौरऊर्जा प्रकल्पाविरोधात तक्रार दाखल करण्यासाठी कडसुरेच्या गावबैठकीत एकमुखी ठराव

## एकजुटीने लढा देण्याचा ग्रामस्थांचा निर्धार

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठण्याजवळील कडसुरे (ता. रोहा) गावाच्या हद्दीत होऊ घातलेल्या येथील रिलायन्स कंपनीच्या प्रस्तावित सौरऊर्जा प्रकल्पा संदर्भात रिलायन्स व्यवस्थानाबरोबर कडसुरे गाव कमिटीच्या झालेल्या दोन बैठकांमध्ये नोकरी व रोजगाराच्या प्रमुख मागणीसह इतर कोणत्याही बाबतीत समाधानकारक तोडगा निघालेला नाही. त्यामुळे आता रिलायन्सच्या या सौरऊर्जा प्रकल्पा विरोधात राष्ट्रीय हरित लवाद पुणे, पर्यावरण व वन मंत्रालय, नवी दिल्ली तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे लेखी हरकत व तक्रार दाखल करण्यासंदर्भात ठराव कडसुरे ग्रामस्थांच्या २० फेब्रुवारीला सायंकाळी झालेल्या गावबैठकीत एकमुखाने घेण्यात आला. याचबरोबर याप्रकरणी रिलायन्स विरोधात एकजुटीने लढा देण्याचा निर्धार यावेळी ग्रामस्थांनी केला.

कडसुरे येथील श्री हनुमान मंदिरात संपन्न झालेल्या या गावबैठकीला कडसुरे ग्रामस्थ पकल्प गावकमिटीतील अरुणभाऊ शिर्के, दिलीप शिंदे, महेश शिंदे, दत्तात्रेय शिर्के, रमेश शिर्के, रविंद्र शिर्के, तेजस शिर्के आदींसह यशवंत शिर्के, धाकू शिर्के, कृष्णकांत शिर्के, नथुराम पाटेकर, समाधान शिंदे, पोलीस पाटील विठ्ठल शिंदे तसेच ग्रामस्थ यावेळी बहुसंख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करतांना अरुणभाऊ शिर्के यांनी सांगितले की, सौरऊर्जा प्रकल्पासंदर्भात रिलायन्स व्यवस्थापनाबरोबर झालेल्या पहिल्याच बैठकीत गावकमिटीला संशयास्पद भूमिका आढळली. त्याचवेळी आपल्या सडेतोड भूमिकेमुळे त्यांना आपण ठिकाणावर आणले. त्यावेळी त्यांनी सहकार्य करण्याचे आश्वासन गाव कमिटीला दिले होते. मात्र रिलायन्सचा पूर्व इतिहास आपल्याला माहित असल्याने त्यांनी आपल्यातच तोडफोडीचे राजकारण सुरु केलेले आहे. मात्र जी सहानुभूती आपल्याला आयपीसीएलच्या वेळी मिळाली होती ती आता हा खासगी प्रकल्प असल्याने मिळणार नसल्याने आपली एकजूट आता महत्वाची आहे. आपल्याला प्रकल्प तर हवाच आहे मात्र त्याचबरोबर नोकरी, रोजगार व विकासही हवा आहे. आपल्या अनेक मागण्या असल्या तरी आपण व्यवस्थापनाला ११० जणांची यादी नोकरीसाठी दिलेली आहे. त्यामुळे आधी नोकरीवर बोला नंतरच पुढील चर्चा होईल असे आपण त्यांना ठणकावून सांगितले आहे. तसेच या आपल्या लढ्यात गा-वातील ५० मुले जरी नोकरीला लागली तर त्याचे पुण्य आपल्याला मिळणार असल्याने गाव कमिटीवर विश्वास ठेवा तसेच आपण कंपनीचे ठेकेदार म्हणून आवश्य काम करा मात्र या लढ्यात ठेकेदारांनीही एक ग्रामस्थ म्हणून सहभागी व्हा असे आवाहनही शेवटी अरुणभाऊ शिर्के यांनी केले.

या गाव बैठकीत दत्तात्रेय शिर्के, दिलीप शिंदे यांनीही मार्गदर्शन केले. तसेच यावेळी नोकरीसाठीच्या यादीतील १०-१२ वी, बी.ए., बी.कॉम., बी.एससी., अभियांत्रिकी पदविका/पदवी, आय. टी.आय शिक्षण असलेल्या अर्जदारांची नावे रविंद्र शिर्के यांनी वाचून दाखविली. दरम्यान येत्या काही दिवसांत कंपनीने गाव कमिटीला समाधानकारक निर्णय दिला नाही तर तीव्र आंदोलनाची पुढील दिशाही ठरविण्यात येईल असा इश-ाराही यावेळी गाव कमिटीकडून रिलायन्स व्यवस्थापनाला देण्यात आला.

# डिके चषक 2022 मध्ये आयंश स्पोर्ट्स कोपर पनवेल संघ अंतिम विजेता

## पेणमध्ये पहिल्यांदाच १ लाख रुपये बक्षिसाच्या सामन्यांचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पेण**

पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पेण येथील समाजसेवक दत्ता कांबळे यांनी प्रथमच पेण नगरपालिकेच्या भव्य मैदानावर टेनिस क्रिकेट सामन्यांचे आयोजन केले होते. या सामन्यांत आयंश ११ स्पोर्ट्स कोपर पनवेल संघ अंतिम विजेता ठरला. तर रायबादेवी रावे संघ उपविजेता ठरला. पेण तालुक्यामध्ये पहिल्यांदाच १ लाख रुपये पारितोषिक असलेल्या टेनिस क्रिकेट सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते.



छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियमवर झालेल्या या क्रिकेट सामन्यांत पनवेल, नवी मुंबई, भिवंडी, ठाणे, पेण, अलिबाग, उरण, महाड, रोहा, पुणे, खोपोली, कर्जत आदी शहरांतील ३२ संघांनी सहभाग घेतला होता. यामध्ये झालेल्या चुरशींच्या लढतींमध्ये पनवेल तालुक्यातील कोपर येथील आयंश ११ स्पोर्ट्स संघ प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला, त्यांस १ लाख रुपये रोख रक्कम व भव्य ट्रॉफी देण्यात आली. तर पेण तालुक्यातील रायबादेवी रावे संघ द्वितीय क्रमांकाचा मानकरी ठरला, त्यांस ५० हजार रुपये रोख व भव्य ट्रॉफी देण्यात आली. तृतीय क्रमांक आलिशान नागोठणे संघास २५ हजार रोख व ट्रॉफी व चतुर्थ क्रमांक विशाल पेरवी दादर संघास २५ हजार व ट्रॉफी देण्यात आली. यावेळी पेण पत्रकार व पेण पोलिस आणि पेण महावितरण व वक्रतुंड मंडळमध्ये मैत्रीपूर्ण लढत खेळविण्यात आली. तर पेण ग्रामीण व पेण शहर संघात प्रेक्षणीय सामना खेळविण्यात आला.

सदर सामन्यांच्या बक्षीस वितरण कार्यक्रमास भिवंडीचे शिवसेनेचे आमदार रुपेश म्हात्रे, रायगडचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक अमोल झेंडे, शेकापचे माजी आमदार धैर्यशील पाटील, पेण प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार, समाजसेवक दत्ता कांबळे, श्रीमती साधना कांबळे, पेण डीवायएसपी विभा चव्हाण, माणगाव डीवायएसपी प्रवीण पाटील, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, काँग्रेस नेते ऍड.प्रवीण ठाकूर, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संजय भुस्कुटे, केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचे स्विय्य सहाय्यक घनश्याम चिरणकर, जिल्हा परिषद सदस्य डी.बी.पाटील, अलिबाग पोलीस निरीक्षक शैलेश सनस, पेण पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ, वडखळ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार, दादर सहाय्यक पोलीस निरीक्षक गोविंद पाटील, पोयनाड सहाय्यक पोलीस निरीक्षक अतिग्रे, अलिबाग सहाय्यक पोलीस निरीक्षक लांगी, नरेंद्र पाटील, शिवसेनेचे माजी शहर प्रमुख प्रदीप वर्तक, राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष दयानंद भगत, शिवसेना पेण तालुका प्रमुख तुषार मानकावळे, मनसे तालुका अध्यक्ष रुपेश पाटील, भिवंडी विभाग प्रमुख रोहिदास म्हात्रे, नगरसेवक निवृत्ती पाटील, शिवसेना भिवंडी तालुका प्रमुख अरुण पाटील, माजी नगरसेवक समीर म्हात्रे, जेष्ठ समाजसेवक अण्णा कडू, सभापती दर्शन बाफणा, पेण प्रेस क्लब अध्यक्ष देवा पेरवी, राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष झेन नाईक, राष्ट्रवादीचे युवक अध्यक्ष विकास पाटील, पाटणेश्वर सरपंच नरेंद्र पाटील, अंतोरे सरपंच अमित पाटील, कळवे सरपंच कमलाकर पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. सदर सामने पार पाडण्यासाठी डिके चषक वक्रतुंड मित्र मंडळाचे मंगेश पाटील, राज कडू, लल्ला वास्कर, विनायक पाटील, स्वप्नील पाटील, शुभम पाटील, रोहन पाटील, राजू कांबळे, सूरज म्हात्रे, सचिन म्हात्रे, नारायण पाटील व सदस्यांनी विशेष मेहनत घेतली.

# राजिप शाळा तळाघर येथे शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

रोहा तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा तळाघर येथे शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला.

बहुजन प्रतिपालक, कुळवाडी भूषण जगविश्वविख्यात छत्रपती शिवाजी महाराज हे अखिल महामानव जातीचे उद्गाते होय सर्व धर्म समभाव, समतेचे प्रतीक म्हणून लौकिक मिळवलेल्या एकमेव उद्वितीय छ. शिवरायांची शिवजयंती भारत वाशियांचा राष्ट्रीय उत्सव आहे आणि या उत्सवाचे औचित्य साधून रा.जि.प.शाळा तळाघर येथील विद्यार्थी वर्ग व ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने ढोल ताश्यांच्या गजरात छत्रपती शिवरायांची जयंती साजरी करण्यात आली या प्रसंगी विद्यार्थ्यांनी विविध पोशाख परिधान करून शिवपूजन, मानवंदना,पालखीतुन शिवरायांची मिरवणूक, लक्ष्मी पत्रक, विद्यार्थ्यांनी पारंपारिक आखाडे,दांडपट्टा, लाठीकाठी बनाटी खेळणे, उड्या मारणे, मुलींनी फुगड्या खेळ तसेच तळवार चालवणे इत्यादी खेळ खेळत श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती उत्सवाचा आनंद लुटला.

प्रसंगी यावेळी तळाघर ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ माधवी मनोज कळंबे,नवनिर्वाचित उपसरपंच संतोष हरिश्चंद्र माने, शाळा व्यवस्थापन समिती च्या अध्यक्षा सौ मोनिका मच्छिंद्र मोरे, केंद्रप्रमुख नारायण गायकर,पीएनपी माध्यमिक हायस्कूल तळाघरचे अध्यक्ष विठ्ठल मोरे, माजी सरपंच संदेश मोरे, ग्रामपंचायत सदस्य सौ विद्या रुपेश शिंदे, सौ विद्या देविदास शिर्के, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य सौ संगीता ज्ञानेश्वर मोरे, मोनिका मोरेश्वर मोरे, मीनाक्षी विनोद कमाने, प्रिया लीलाधर मोरे, राजश्री मोरे, मानसी मोरे, सदाभाऊ मोरे,कराटे मार्शलचे प्रशिक्षक मेघेश मोरे, गाव कमिटी अध्यक्ष दत्ताराम मोरे, पोलीस पाटील मंगेश सखाराम मोरे,संतोष चव्हाण,ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रामचंद्र मोरे, एकविरा आर्ट मंडळाचे अध्यक्ष- मच्छिंद्र मोरे, देविदास शिर्के, गोविंद कळंबे, लिंबाजी शिर्के, यशवंत मोरे, नथुराम माने आदी शिक्षक वर्ग विदयार्थी ग्रामस्थ युवक मंडळ, युवती व शिवप्रेमी बहुसंख्येने उपस्थित होते. प्रसंगी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे मुख्याध्यापक विकास सुटे यांनी करत प्रस्तावित करतांना त्यांनी शिवजयंती बद्दल व श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विषयी मोलाचे मार्गदर्शन केले तसेच शाळेतील विद्यार्थी वर्गाने व उपस्थित मान्यवरांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले.शाळेतील शिक्षक विलास घोटेकर, किशोर कोळेकर, सौ वृषाली माळी, ज्योती महाजन, यांनी तसेच विद्यार्थी व युवकांनी हे कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अधिक मेहनत घेत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती अत्यंत उत्साहात ग्रामस्थ युवक-युवती पालक यांच्या समवेत साजरी करण्यात आले व शेवटी शिक्षक कोळेकर यांनी या कार्यक्रमाचे आभार मानून विद्यार्थी वर्गाला गोड खाऊ वाटप करून सांगता करण्यात आली.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## राज्य सरकारी कर्मचारी दोन दिवसांच्या संपावर

वेतन देवून कंत्राटी व योजना कामगार यांच्या सेवा नियमित करा, शासकीय विभागात खासगीकरण नको, बक्षी समिती अहवाल खंड दोन प्रसिध्द करा, सर्व विभागातील रिक्त पदे तत्काळ भरा, केंद्राप्रमाणे भत्ते द्या, अनुकंपावरील भरती लवकर करा, निवृत्तीचे वय ६० वर्ष करा, नवीन शिक्षण धोरण लागू करा, महिला कर्मचार्यांना केंद्राप्रमाणे बालसंगोपण रजा मंजूर करा, कर्मचारी-शिक्षकांना पितृत्व रजा मंजूर करा, मागासवर्गीय कर्मचार्यांचे रोखलेले पदोन्नतीतील आरक्षण लागू करा, शिक्षण क्षेत्रातील विनाअनुदान धोरण रद्द करा, सर्वच कर्मचाऱ्यांना पाच दिवसाचा आठवडा लागू करा.

## पनवेलने केले गजाआड

गुन्हे शाखा, कक्ष २, पनवेल चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे यांचे मार्गदर्शनाखाली मोबाईल चोरीच्या गुन्हयांचा अभिलेख पडताळून मोबाइल चोरीची पद्धत, तारीख, वेळ या प्रमाणे त्याचे विश्लेषण केले असता काही गुन्हे हे एका ठराविक गुन्हेगारांकडून केले जात असल्याचे निष्पन्न झाले.

मोबाईल चोरीच्या गुन्हयाचा समांतर तपास करीत असताना गुन्हे शाखा कक्ष २ चे सपोनि फडतरे, पोलीस नाईक अजिनाथ फुंदे यांनी केलेल्या तांत्रिक तपासावरून अटक आरोपी नामे सलमान इक्बाल मुकादम, वय २३ वर्ष, यास सापळा रचून पोउनि मानसिंग पाटील व पथकाने ताब्यात घेतले त्यांनतर अटक आरोपीताकडे अतिशय कौशल्यपुर्ण केलेल्या तपासादरम्यान अटक आरोपीकडून ४,५०,०००/- रूपये किंमतीचे एकुण २८ मोबाईल हस्तगत केले आहेत. सदरच्या गुन्हयाच्या तपासादरम्यान सपोनि संदिप गायकवाड, पोउनि वैभव रोंगे, पोहवा अनिल पाटील, पोहवा ज्ञानेश्वर वाघ, पोहवा प्रशांत काटकर, पोहवा मधुकर गडगे, पोहवा सचिन पवार, पोहवा रणजित पाटील, तुकारामसुर्यवंशी, पोहवा राजेश बैकर, पोना निलेश पाटील, पोना दिपक डोंगरे, पोना सचिन म्हात्रे, पोना रूपेश पाटील, पोना इंद्रजित कानु, पोना राहुल पवार, पोना प्रफुल्ल मोरे, पोशि संजय पाटील, पोशि प्रविण भोपी, पोशि विक्रांत माळी, पोहवा जगदिश तांडेल, पोशि नंदकुमार ढगे, पोशि अभय मेऱ्या यांनी उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे.

## एका व्यक्तीच्या घरावर भीषण हल्ला

करण्यासाठी धाव घेतली. यावेळी श्रीवर्धन पोलिसांनी फक्त अदखलपात्र गुन्हा दाखल करून घेतला. वास्तविक पाहता घरावर हल्ला झाल्यानंतर त्या ठिकाणी दंगलीचा गुन्हा दाखल होणे अपेक्षित होते. चिमण यांच्या फिर्यादीनुसार श्रीवर्धन पोलीस ठाण्यामध्ये फौजदारी गुन्हा दाखल होणे अपेक्षित होते. परंतु श्रीवर्धन पोलिसांवर असलेल्या राजकीय दबावामुळे पोलिसांनी सदर प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला. असा आरोप फिर्यादी अरुण चिमण यांनी केला आहे. राजकीय दबावापोटी आरोपींना जर का अशा प्रमाणे पाठीशी घातले जात असेल तर महाराष्ट्राचा लवकरच बिहार होईल असे बोलले जात आहे. आरोपींवरती अदखल पात्र गुन्हा झाल्यानंतर श्रीवर्धन तहसील कार्यालय या ठिकाणी त्यांच्यावर ती चाप्टर केस होणे अपेक्षित असताना सदर आरोपी गावामध्ये मोकाट फिरत असल्याचे निदर्शनास येत आहे. याबाबत फिर्यादी अरुण चिमण यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक यांचेकडे देखील आपल्या वरती झालेल्या अन्यायाबद्दल अर्ज केला असून सदर आरोपींवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी केली आहे. अद्यापही भोस्ते गावातील ४० ते ५० तरुणांचा ग्रुप अरुण चिमण यांच्या घरासमोर असलेल्या त्यांच्या चुलत भावाच्या पडवीमध्ये रात्री एक ते दीड वाजेपर्यंत गडबड-गोंधळ करत असल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामुळे चिमण यांचे संपूर्ण कुटुंब दहशतीखाली असून त्यांना लवकरच जिल्हा पोलिस अधीक्षकांनी न्याय द्यावा अशी मागणी कुटुंबियांकडून केली जात आहे.

# वृद्ध महिलेच्या गळ्यातील सोन्याची चेन खेचून पसार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका वृद्ध महिलेच्या गळ्यातील सोन्याची चेन खेचून मोटार सायकलवरुन आलेले दोघे इसम पसार झाल्याची घटना तक्का गाव परिसरात आज सकाळी घडली आहे.

पुष्पासन म्हात्रे (७० रा.तक्का ईडन गार्डन सोसायटी) या त्या परिसरातून पायी जात असताना मोटार सायकलवरुन आलेल्या दोन अज्ञात इसमापैकी एकाने त्यांच्या गळ्यातील १५ ग्रॅम वजनाची सोन्याची चेन ज्याची किंमत जवळपास ६५ हजार रुपये इतकी आहे खेचून पोबारा केला आहे. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# अनमोल इंग्लिश मिडीयम स्कूल बोकडविरा येथे श्री छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना

**दै.रायगड नगरी । उरण**

अनमोल इंग्लिश मिडीयम स्कुल बोकडविरा शाळा सर्व सण अतिशय उत्साहात साजरे करण्यासाठी प्रसिद्ध आहे. दरवर्षी शिवजयंती उत्सव उत्साहात साजरी करताना शाळा ते श्री गणपती मंदिर अशी श्री छत्रपतींची मिरवणूक काढली जाते. दरवर्षी काहीतरी नवीन कार्यक्रम करून छत्रपतींना मानवंदना देण्याचा शाळेचा प्रयत्न असतो.यावर्षी मिरवणूकीवर बंदी असल्याने शाळेतच शिवरायांचा पाळणा अतिशय उत्तम प्रकारे सादर करण्यात आला. तसेच छत्रपतीची आग्राहुन सुटका असे एक नाट्य सादरीकरण करण्यात आले. दोन वर्षाच्या लॉकडाऊन नंतर विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहाने कार्यक्रमात भाग घेतला.शाळेच्या सर्व शिक्षकांनी प्रचंड मेहनत घेऊन हा कार्यक्रम यशस्वी केला.



संपूर्ण उरण तालुक्यात कोणतेही डोनेशन न घेणारी एकमेव शाळा असा नावलौकिक असलेली ही शाळा आहे. खूपच कमी फी आणि गरिबांना मोफत शिक्षण देण्याचे काम ही शाळा करत आहे. असे असून सुद्धा कोणतेही ज्यादा शुल्क न घेता प्रत्येक महिन्याच्या दोन शनिवारी योग गुरु प्राजक्ता सरवैया यांचे एक तास योग शिक्षण, दोन शनिवारी स्टेप आर्ट्स डान्स अकॅडेमीच्या तज्ञ नृत्य शिक्षकाकडून डान्सचे प्रशिक्षण, अभिजित कोशे यांच्याकडून चित्रकलेचे विशेष शिक्षण, संगीत विशारद सविता दिघे यांच्याकडून विशेष संगीत शिक्षण, इयत्ता पहिली पासून संस्कृतचे शिक्षण असे विविध उपक्रम, गुण असलेले शाळेचे रोपटे भविष्यात नक्कीच वटवृक्ष होईल यात काहीच शंका नाही.

गुरुकुलच्या 'धर्तीवर संख्येकडे नाही तर मूल्य जपणे' हे घोष वाक्य असा निर्धार करत शिक्षण क्षेत्रात उंच शिखर सर करण्याचा आमचा मानस आहे. असे उदगार शाळेचे मुख्याध्यापक अजय कृष्णा पाटील यांनी कार्यक्रम प्रसंगी बोलताना व्यक्त केले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## श्री. संत अलिबागकर महाराज पुण्यतिथी सोहळा भक्तीमय वातावरणात संपन्न

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील श्री.क्षेत्र तळवली येथे श्री.संत स्वा. सु.गुरुवर्य अलिबागकर महाराज पुण्यतिथी सोहळा विविध प्रकारच्या धार्मिक कार्यक्रमाने भक्तीमय वातावरणात संपन्न करण्यात करण्यात आला.

स्वा.सु.गुरूवर्य धोंडूमहाराज कोलाटकर यांच्या प्रे-रणेने व ह.भ.प.नायायण महाराज वाजे,ह.भ.प.दत्तू महाराज कोलाटकर (मठाधिपती पंढरपूर) यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या पुण्यतिथी सोहळ्याप्रसंगी विभागातील सांप्रदायाचे मोठ्या संख्येने भाविक भक्त व भगिनी यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती नोंदवून विविध धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घेतला.यावेळी पहाटे गुरूमूर्ती पूजन,कलश स्थापना, ध्वजारोहण,विणा पूजन व विणापहारा भजन,सकाळी रामगड भूषण ह.भ.प.मारूतीमहाराज कोलाटकर याचे पुष्पव्रुष्टीपर किर्तन सेवा तद्नंतर महाप्रसाद, सायं.राम क्रुष्ण हरि बीजमंत्र चिंतन, ह.भ.प.नामदेव महाराज यादव(पाली) यांची प्रवचन सेवा, सामुदायिक हरिपाठ तर रात्रौ ९:३० ते ११:३० ह.भ.प.बाळाराम महाराज शेळके यांची किर्तनरुपी सेवा, नंतर काल्याचे अभंगाने सांगता आदी धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रम संपन्न करण्यात आले.या सोहळ्याचे यशस्वीतेसाठी संतसेवा मंडळ खांब पंचक्रोशी, ग्रामस्थ व महिला मंडळ तसेच जय हनुमान क्रीडा मंडळ तळवली तर्फे अष्टमी यांनी मोलाचे सहकार्य केले.

## साडुला भेटून गेलेला इसम परतलाच नाही

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आपल्या साडूला भेटून घरी परत असलेला इसम अद्याप घरी न परतल्याने तो हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

पांडुरंग राजाभाऊ कांबळे (३५) असे या इसमाचे नाव असून उंची ५ फुट ५ इंच, बांधा मध्यम, वर्ण काळा सावळा, चेहरा उभट, नाक सरळ लांब असून अंगात लाल हिरव्या रंगाचा शर्ट व जिन्स पॅन्ट तसेच पायात काळ्या रंगाची सॅण्डल त्याचप्रमाणे उजव्या हाताच्या मनगटावर मराठीत राधा असे गोंदलेले आहे. त्याला मराठी भाषा अवगत आहे.

या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी २७४५२३३३ किंवा पो. हवा.मंगेश कदम यांच्याशी संपर्क साधावा.

# कुणी कितीही कारस्थाने केली, तरी नगरपालिका निवडणुकीत आम्ही विजयाची हॅट्रीक मारणार : अजय क्षीरसागर

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण नगरपालिकेच्या कारभाराबाबत आमच्यावर कितीही आरोप करा अथवा आपण कितीही उलट सुलट कारस्थाने केलीत, तरी पेण पालिकेवर पुन्हा एकदा आमचीच सत्ता स्थापन होणार असून आम्हीच विजयाची हट्रिक पूर्ण करणार आहोत. गोर गरीब जनतेच्या कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार आपण पेण अर्बन बँकेत केलात, अशा प्रकारचे भ्रष्टाचार करणे हे आमच्या रक्तातच नाही. अशा प्रकारचे प्रत्युत्तर आज पेण नगरपरिषदेचे नगरसेवक अजय क्षीरसागर यांनी शिशिर धारकर यांना पत्रकार परिषदेतून दिले आहे.



शिशिर धारकर यांनी पेण पालिकेच्या भ्रष्टाचारासंदर्भात पत्रकार परिषदेतून सत्ताधाऱ्यांवर आरोप केले होते. त्यावर बोलताना नगरसेवक अजय क्षीरसागर यांनी बोलताना सांगितले की, शिशिर धारकर हे पेण अर्बन बँक घोटाळ्यातील मुख्य आरोपी आहेत. त्यांनी विद्यमान आमदार आणि राज्याचे माजी कॅबिनेट मंत्री रविशेठ पाटील यांच्यावर केलेले आरोप म्हणजे एक प्रकारचा बालिशपणा आहे. त्यांच्या या बेताल वक्तव्याचा आम्ही पेण शहर भाजपच्या वतीने जाहीर निषेध करीत आहोत. असे स्पष्ट करत पेण पालिकेचा कारभार हा पूर्णपणे स्वच्छ असून मागील दहा वर्षात आम्ही केलेली विकासकामे हे याचे ज्वलंत उदाहरण आहे.

याउलट ज्यावेळी पेण अर्बन बँक घोटाळा उघडकीस आला त्यावेळी आपणच रविशेठ पाटील यांच्या घरी पायघड्या घातल्या होतात. त्यावेळी सर्व राजकीय मतभेद बाजूला ठेवून तत्कालीन सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्याकडे केवळ ठेवीदारांच्या हिताचा विचार करून आणि त्यांच्या कष्टाच्या पैशाचा विचार करून रविशेठ पाटलांनी मिटिंग लावून दिली. त्यावेळी आपणच दर महिन्याला पन्नास कोटी रुपये भरण्याचा शब्द दिला होतात. पण आज बारा वर्षे झाली एक रुपया तरी आपण भरलात का ? आधी आपण हे पैसे भरा आणि मगच जनतेसमोर या, असेही त्यांनी सांगितले. आमदार रविशेठ पाटील यांच्याबाबत काही बोलाल तर ते सहन करून घेतले जाणार नाही. त्याबाबत पेण शहर भाजपच्या वतीने सडेतोड उत्तर दिले जाईल असा इशारा देखील नगरसेवक अजय क्षीरसागर यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेतून देण्यात आला. या पत्रकार परिषदेला माजी नगरसेवक बाळासाहेब जोशी, माजी नगरसेवक प्रशांत ओक, पेण शहर युवा मोर्चा अध्यक्ष मितेश शहा व पदाधिकारी उपस्थित होते.

## मुख्याध्यापिका अर्चना खाडे चव्हाण सर्वोत्कृष्ट शाळा प्रमुख पुरस्काराने सन्मानित



**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका अर्चना खाडे चव्हाण सर्वोत्कृष्ट शाळा प्रमुख पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

शिक्षणाच्या विस्तारासाठी मिश्रित शिक्षणाने संधी उपलब्ध करून दिली आहे. ही विद्यार्थी केंद्रित पद्धत अलीकडच्या काळात खूप यशस्वी ठरली आहे. सर्वोदय स्कूल कॉम्प्लेक्सने सिंघानिया क्रेस्ट प्लस च्या संयुक्त विद्यमाने, मिश्रित शिक्षणावर अधिक प्रकाश टाकण्यासाठी एका खास कार्यक्रमाचे आयोजन केले होते जे कोरुना संकटाच्या काळात सामान्य झाले. या कार्यक्रमासाठी विविध शाळांमधील ७० हून अधिक शाळांच्या मुख्याध्यापकांनी सहभाग घेतला होता. या कार्यक्रमात लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, कामोठे शाळेच्या मुख्याध्यापिका अर्चना खाडे चव्हाण यांनी सहभाग घेतला. या चर्चासत्राच्या शेवटी सात जूरी सदस्यांनी उत्कृष्ट शाळा प्रमुखपुरस्कार नामंकानांचे मूल्यमापन केले.नामांकनांमध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल कामोठे येथील मुख्याध्यापिका अर्चना खाडे चव्हाण यांना शैक्षणिक क्षेत्रातील प्रशंसनीय योगदानाबद्दल सर्वोत्कृष्ट सर्वांगीण शिक्षणाचा प्रसार करणाऱ्या सर्वोत्कृष्ट शाळा प्रमुख पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मुख्याध्यापिका अर्चना खाडे चव्हाण यांचा सत्कार केला. यावेळी रायगड विभागीय अधिकारी रोहिदास ठाकूर, पीआरओ बाळासाहेब कारंडे आदि उपस्थित होते.

## नवी मुंबई मेट्रो रेल्वे मध्ये २०० अधिकारी-कर्मचारी नियुक्त

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात नवी मुंबई मेट्रो रेल्वे सेवा सुरु करण्यात येणार असल्याचे सिडको तर्फे सांगण्यात आले होते. मात्र, नवी मुंबई मेट्रो रेल्वे मार्गावरील काही स्थानकांचे काम अपूर्ण होते. परंतु, गेल्या दीड महिन्यात नवी मुंबई मेट्रो रेल्वे स्थानकांचे अपूर्ण काम पूर्ण होत आहे. त्यामुळे मार्च महिन्यात नवी मुंबई मेट्रो रेल्वे सुरु होणार असल्याने 'महामेट्रो'ने मेट्रो रेल्वेसाठी आवश्यक अधिकारी- कर्मचारी यांची भरती केली असून, सुरक्षा रक्षकांना विविध प्रकारचे प्रशिक्षण देखील देण्यात आले आहे.

नवी मुंबईतील सार्वजनिक वाहतुकीच्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरणार्या 'नवी मुंबई मेट्रो रेल्वे'च्या सर्व डबे आणि विद्युत यंत्रणेला भारतीय रेल्वे मंडळाकडून नुकतीच मंजुरी मिळाली आहे. गेल्या वर्षी या मार्गाची ऑसिलेशन, विद्युत, अत्यावश्यक ब्रेक यांच्या चाचण्या झाल्या असून, आरडीएसओ या रेल्वे संस्थेकडून प्रमाणपत्रेही मिळाली आहेत. लवकरच स्थापत्य कामांची पाहणी झाल्यानंतर मेट्रो रेल्वे सुरक्षा आणि रेल्वे प्रशासनाकडून नवी मुंबई मेट्रो रेल्वे सेवा सुरु करण्यास परवानगी दिली जाणार आहे. त्यामुळे मेट्रोसाठी लागणारे तज्ञ अधिकारी आणि कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पेंधर, तळोजा पेठाली, अमनदूत, पेठपाडा आणि सेंट्रल पार्क स्थानक दरम्यान धावणार्या तीन डब्यांची नवी मुंबई मेट्रो रेल्वे सुरु झाल्यावर त्यासाठी लागणारे ट्राफिक कंट्रोलर, डेपो कंट्रोलर, रेल्वे गार्ड, ट्रेन ऑपरेटर, तिकिट काउंटर आदी अधिकाऱ्यांची वर्तमान पत्रात जाहिरात देवून भरती करण्यात आली आहे. भरती केलेले अधिकारी विविध मेट्रो मध्ये काम केलेले तज्ञ, प्रशिक्षित आहेत. तसेच मेट्रो रेल्वे स्थानकावर सुरक्षा अधिकारी, सुरक्षा रक्षक आणि स्टेशन स्वच्छतेसाठी स्वीपर आदी जवळपास दोनशे अधिकारी- कर्मचारी मनुष्यबळाची भरती करण्यात आली आहे. दरम्यान, 'नवी मुंबई मेट्रो रेल्वे' मध्ये भरती करण्यात आलेले सर्व अधिकारी-कर्मचारी अनुभवी आहेत. नवी मुंबई मेट्रो रेल्वे स्थानकांची सुरक्षा कशा प्रकारे असावी, यासाठी सुरक्षा अधिकार्यांकडून सुरक्षा रक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. नवी मुंबई मेट्रो रेल्वे सुरु झाल्यावर कोणत्याही प्रकारची उणीव भासणार नाही, अशा प्रकारचे प्रशिक्षण सर्व अधिकारी-कर्मचारी यांना देण्यात आले आहे, असे 'महामेट्रो'च्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

## व्हिडीओ अल्बम स्पर्धेचे बक्षीस वितरण उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

महाराष्ट्र नवनिर्माण चित्रपट कर्मचारी सेनेतर्फे मराठी व्हिडीओ अल्बम गाण्याची भव्य स्पर्धा २०२२ ला जनतेचा उत्तम प्रतिसाद मिळाला असून या स्पर्धेचे बक्षीस वितरण ससून हॉल, साईनगर सोसायटी, शिर्के गार्डन शेजारी, कळंबोली, तालुका पनवेल येथे मनसेचे पदाधिकारी कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाले. सर्वोत्कृष्ठ प्रथम गीत एकच वादा राजू दादा (परमेश माळी ), दुसरा नंबर -ओ शेठ... (संध्या प्राणिकेत ),३ रा नंबर -तुझी माझी कहाणी या गाण्याला बक्षीस मिळाले. सर्व विजेते स्पर्धकांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. सदर कार्यक्रमाचे आयोजन मनसे चित्रपट सेना रायगड जिल्हाध्यक्ष अक्षय सुतार यांनी केले होते.बक्षीस वितरण मनसे चित्रपट सेना अध्यक्ष अमेय खोपकर यांच्या हस्ते पार पडले.बक्षीस वितरण प्रसंगी चित्रपट सेना संयुक्त सरचिटणीस संदीप सावंत , मनसे नवी मुंबई अध्यक्ष गजानन काळे , रायगड जिल्हाध्यक्ष अतुल भगत , महिला जिल्हाध्यक्ष अदिती सोनार आदी मनसेचे पदाधिकारी उपस्थित होते.

---

मा.पांडे साहेब कोर्ट

श्री.सचिन बा. कांबळे
अर्जदारांचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या कोर्टात
फौ.चौ.अर्ज नं.२३७/२०२२
ने.ता.२३/०३/२०२२

श्री.रईस हुसेनमिया खमसे
वय : ४१ वर्षे, व्यवसाय : धंदा
रा.घर नं.२२ बी, मु.ओवेगाव, पो.खारघर,
सेक्टर ३०, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
पनवेल महानगरपालिका
आरोग्य विभाग, खारघर
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविण्यात येते की, कु. सबा रईस खमसे हिचा जन्म दि.०९/११/२००६ रोजी रा.घर नं.२२ बी, मु.ओवेगाव, सेक्टर-३०, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथे त्यावेळी राहत्या घरी झालेला आहे. परंतु काही कारणास्तव आई वडिलांकडून अनवधानाने कु.सबा रईस खमसे यांची जन्माची नोंद करायची राहून गेली आहे. परंतु काही कारणास्तव जन्माची नोंद करून घेणे व जन्माची नोंद कुठे करतात व कशासाठी करून घेतात याची आम्हा आई वडिलांना काही पूर्व कल्पना नव्हती.

तरी अर्जदार यांच्या जन्माची नोंद बद्दल कोणत्याही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या मागणीबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते सदरचा अर्ज जन्म-मृत्यू नोंदणी कायदा १९६९ कलम १३/३ प्रमाणे जन्माची नोंदणी परवानगीचा अर्जदारांचा अर्जातील मागणी विनंती सिद्ध झाल्यास त्यांना हे जन्माची नोंद मंजूर करेल.

आज दि.२१/०२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक फौ.न्याया, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल**

---

मा.इंदलकर साहेब

ॲड.मनोज वारंगे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. यांचे न्यायालयात
फौ.चौकशी अर्ज नं.१०७१/२०२१
ने.ता.३१/०३/२०२२

कुमार लहू ठाकूर
वय : २२ वर्षे, धंदा : नोकरी
रा.मुर्बी गाव, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
पनवेल महानगरपालिका
निबंधक जन्म मृत्यू खाते खारघर विभाग — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार कुमार लहू ठाकूर यांची आजी कै.लडकूबाई काळुराम ठाकूर यांचा मृत्यू दि.१०/०१/२००५ रोजी मुर्बी गाव, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेला आहे. परंतु अनावधानाने आणि घाईगडबडीत अर्जदार यांचे आजीची मृत्यूची नोंद ग्रामपंचायत / पंचायत समिती / महानगरपालिका येथे केलेली नाही. म्हणून अर्जदार यांनी मे.पनवेल न्यायालयात अर्जदार यांचे आजीची मृत्यूची उशिरा नोंद होणेकामी पनवेल महानगरपालिका यांस आदेश देणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर अर्जदार कुमार लहू ठाकूर यांची आजी कै.लडकूबाई काळुराम ठाकूर यांचा मृत्यू दि.१०/०१/२००५ रोजी मुर्बी गाव, ता.पनवेल, जि.रायगड येथे झाला आहे किंवा नाही असे कोणास काही सांगावयाचे असल्यास या जाहीर नोटीसीचे तारखेपासून ३० दिवसांचे आत अशा व्यक्तीने न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात.

या जाहीर नोटीसीवरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत घेतली किंवा दाखविली नाही तर सदरहू न्यायालय अर्जदार यांचा लागलीच पुरावा घेवून पनवेल महानगरपालिका यांस सदरहू अर्जदार यांचे आजीचे मृत्यूची उशिरा नोंद करण्याचा आदेश देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी आज दि.२२/०२/२०२२ रोजी दिली.

**सही/- क.लिपीक फौ.न्याया, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल**

---

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.उदय गोपाल शेट्टी आणि श्री.अतीश उदय शेट्टी हे मौजे : तळेगाव, तालुका : खालापूर, जिल्हा : रायगड येथील खाली नमूद केलेली शेतजमीन मिळकत त्यांचे विद्यमान मालक श्री.संजय उर्फ संजू लक्ष्मण हिंगे यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.**
**मौजे : तळेगाव, तालुका : खालापूर, जिल्हा : रायगड**

| अनु क्र. | मौजे | सर्व्हे नंबर /हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १ | तळेगाव | १६/११ | ०-२४-०० | ३.६२ |
| २ | तळेगाव | १६/१७ | ०-०३-०० | ०.४२ |

सदर मिळकत निर्वेध असल्याची हमी विद्यमान मालक यांनी दिली आहे. तरी सदर मिळकतीचे बाबतीत अथवा तिच्या कोणत्याही हिश्श्याचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, ॲटॅचमेंट, लीन, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा वगैरे कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील पत्यावर प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी हरकती प्रत्यक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे विक्री व हस्तांतरणाचे व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २३/०२/२०२२
पनवेल

**सही/-**
**ॲड.आर.एम.भंडारी**
**ऑफिस क्र.५, तळमजला, १०२, बोरा बाजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई-४००००१**
**मो.नं.९८३३८८५५५४**
**९८३३८८६६६४**

---

वकील सुनिता राम पाटील आणि
दर्शना सोमनाथ पाटील

### जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर, पनवेल यांच्या न्यायालयात
चौकशी अर्ज क्र.६८/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१९/०३/२०२२

१) श्रीमती.शशिकला अशोक उपाध्याय
वय : २७ वर्षे, भारतीय रहिवासी
२) श्री.प्रशांत अशोक उपाध्याय
वय : २७ वर्षे, भारतीय रहिवासी
रा.जी-७०१, हावरे स्पेंल्डर, सेक्टर २०, खारघर — अर्जदार

मयत कै.अशोक सुर्यनारायण उपाध्याय यांचे दि.१० ऑगस्ट २०१९ रोजी, जी-७०१, हावरे स्पेंल्डर, सेक्टर २०, खारघर येथे मृत्यू झालेले आहेत. अर्जदार १) श्रीमती.शशिकला अशोक उपाध्याय ही मयत यांची पत्नी आहे. अर्जदार २) हा मयत यांचा मुलगा आहे. अर्जदार हे भारतीय रहिवासी, राहणार जी-७०१, हावरे स्पेंल्डर, सेक्टर २०, खारघर., तसेच मयत यांच्या नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे :-

**मिळकतीचे वर्णन**

**Bearing No.G/701, 7 th Floor, Plot No.52 & 56, Sector-20, Kharghar, Navi Mumbai, Saleable area 754.25 Sq. Ft., Terrace Area 56 Sq.Ft., Total agreement value as per agreement for sale is Rs. 8,21,363/-(Rupees Eight Lakh Twenty one Thousand Three Hundred Sixty Three Only) 1/3 Share of that Rs.2,73,787/- (Rupees Two Lakh Seventy Three Thousand Seven Hundred Eighty Seven Only) Approximately.**

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदारांनी वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज दिला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार हे मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क अधिकार हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

दि.२२/०२/२०२२ माहे २०२२

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मे.गोडसे सो

ॲड.विजयेंद्र नारायण मुंढे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौकशी अर्ज क्र.४६९/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२३/०३/२०२२

१) श्री.गणेश उंदीर गोंधळी
वय : ५८ वर्षे, व्यवसाय : शेती
२) श्री.संतोष उंदीर गोंधळी
वय : ४५ वर्षे, व्यवसाय : शेती
दोघेही रा.घर नं.१०९ बी, गणेश मंदिराजवळ,
कामोठे गाव, कळंबोली नोड, रायगड ४१०२१८
३) सौ.यमुना विठ्ठल पाटील
वय : ५५ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.वळवली गाव, पोस्ट पडघे, पनवेल-वावंजे,
विठ्ठल मंदिराजवळ, तालुका : पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

सदरहू अर्जदार वर नमूद पत्यावर राहतात. वर नमूद अर्जदार क्र.१ ते ३ हे कै.रामुबाई उंदीर गोंधळी यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार क्र.१ व २ ही कै.रामुबाई उंदीर गोंधळी यांची मुले असून अर्जदार क्र.३ ही मुलगी आहे.

अर्जदार नं.१ ते ३ हेच कै.रामुबाई उंदीर गोंधळी यांचे वारसदार आहेत. तसेच अर्जदार नं.१ ते ३ यांच्याशिवाय कै.रामुबाई उंदीर गोंधळी यांस आणखी कोणीही वारसदार नाहीत.

कै.रामुबाई उंदीर गोंधळी यांचे वडिलांच्या म्हणजेच कै.नामदेव विठू पालेकर यांचे नावे असलेल्या तसेच ताबेकब्जातील व सामाईक मालकीच्या असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| अ.नं. | मौजे/यु.के.नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | वळवली | २२<br>२२<br>२५ | २<br>१ ए<br>० | ०-६५-०<br>०-४०-७<br>०-१२-० | ११.६९<br>८.०६<br>०.२५ |
| २ | आंबेतखार | १६+१ ते २४+१३० ते १४१+१४७<br>४३८ | २८५ | ०-३८-४ | ५.३३ |

कै.रामुबाई उंदीर गोंधळी यांचे वर नमूद मिळकतीस अर्जदार हेच वारसदार आहेत असा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे.दिवाणी न्या.वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर वर नमूद केलेल्या मिळकतीस कै.रामुबाई उंदीर गोंधळी यांचे अर्जदार हेच वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारसदाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.२२/०२/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

प्रोसेस जमा रु.५०/- — वकील : विकास अतकारी

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.सोनवणे साहेब दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) पनवेल यांचे न्यायालयात
चौ.अर्ज क्र.१५४५/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०८/०४/२०२२

श्री.आनंद कृष्णा घरत
रा.मुक्काम पोस्ट : वहाळ,
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२०६ — अर्जदार

अर्जदार यांचे वडील कृष्णा बाळू घरत यांचे निधन दि.२९/०५/२०२१ रोजी मुक्काम पोस्ट : वहाळ, ताालुका : पनवेल, जिल्हा : रायगड-४१०२०६ येथे झाले असून त्यांनी खालील वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात नोंदणीकृत मृत्यूपत्र दि.१५/०५/२०१८ रोजी केलेले आहे. मयत कृष्णा बाळू घरत यांच्या नावे त्यांच्या हिश्श्याप्रमाणे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे :-

**SCHEDULE OF PROPERTIES**

**1) Residential Flats/Non-residential shops:- situated at Eden Park, Plot No.176, Sector-19, Ulwe Node, Taluka - Panvel, Dist-Raigad**

| Sr. No. | Flat No. | Carpet Area Sq.ft. | Additional Carpet Area Sq.ft. | Terrace | Shares of Deceased |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 101 | 790.314 | 118.070 | 78&95 | 50% |
| 2 | 102 | 790.314 | 119.685 | 95.00 | 50% |
| 3 | 103 | 577.114 | 130.783 | - | 50% |
| 4 | 104 | 577.144 | 130.783 | 140.00 | 50% |
| 5 | 204 | 577.144 | 118.275 | - | 50% |
| 6 | 205 | 577.144 | 118.275 | - | 50% |
| 7 | 303 | 561.289 | 110.202 | - | 50% |
| 8 | 402 | 790.314 | 174.030 | - | 50% |
| 9 | 503 | 561.289 | 110.202 | - | 50% |
| 10 | 603 | 561.289 | 109.395 | - | 50% |
| Shop | Shop No.6 | 286.462 | 33.907 | - | 50% |

**2) Plot obtained under the Land acqusition for Navi Mumbai International Airport Under 22.5% Scheme:-**

| Award No. | Details of Acquired Land | | Details of Allotted Plot | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | Survey No. | Area | Sector No. | Plot No. | Adm. about | Node |
| **Wahal 25** | 290/5<br>289/6 | 0-07-9<br>0-08-0 | 3 | 79 | 260 | Pushpak Dapoli |

Total value of ther property is **Rs.2,81,31,060/-(Rupees Two Crore Eighty One Lakh Thirty One Thousand Sixty Only)** approximately

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदाराचा प्रोबेट दाखला मिळण्याकरिता अर्ज दिला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार हे मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या प्रोबेट दाखल्याबद्दल कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वरील नमूद मिळकती संदर्भात प्रोबेट सर्टीफिकेट देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.९/२/२०२२ रोजी माझे सहीने दिले.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## घरकाम करण्याच्या बहाण्याने दागिने लंपास करणारी महिला गजाआड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

घरकाम करण्याच्या बहाण्याने विश्वास संपादन करून घरातील लाखो रुपये किंमतीचे दागिने लंपास करणाऱ्या महिलेस खारघर पोलिसांनी बीड, कात्रज पुणे येथून ताब्यात घेतले आहे.

खारघर पोलीस ठाणे हद्दीत फिर्यादी नामे श्रीमती लिला चंतुरी गौडा, वय ३६ वर्षे, यांनी घरकामास ठेवलेले महिलेने फिर्यादी यांचे घराचे कपाटातील लॉकरमध्ये असलेले सोन्याचे दागिने चोरी केल्याने फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून खारघर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. वर नमुद गुन्हयातील आरोपीताबाबत कोणताही ठोस पुरावा नसताना कौशल्यपुर्वक तांत्रिक तपास करुन यातील महिला आरोपी निता श्याम गर्जे वय २७ वर्षे हिस बिड, कात्रज पुणे येथे जावुन मागोवा घेवुन सदर आरोपी महिलेस अटक करण्यात आली. तिचेकडुन ३६ ९९ ५० / –रू किं. सोन्याचे चोरी केलेले दागिने जप्त करण्यात आले आहेत.

सदरची कामगिरी पोलीस आयुक्त बिपिन कुमार सिंह, सह पोलीस आयुक्त जय जाधव, पोलीस उप आयुक्त शिवराज पाटील, परिमंडळ २, पनवेल, भागवत सोनवणे, सहा.पोलीस आयुक्त, पनवेल विभाग, नवी मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि संदीपान शिंदे, सपोनिरी मानसिंग पाटील, पोहवा बाबाजी थोरात, पोशि शिंगाडे, पोशि आव्हाड, मपोशि आंबकर यांनी केलेली आहे. सदर गुन्हयाचा तपास खारघर पोलीस ठाणेमार्फत चालु आहे.

## द्रोणागिरी, उलवे, खारघर नोडसह हेटवणे जलवाहिनीवरील गावांचा पाणी पुरवठा बंद

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

सिडकोच्या हेटवणे पाणी पुरवठा योजने अंतर्गत असलेल्या वाहिनीवर महावितरणकडून होणाऱ्या विजेचा पुरवठा त्यांच्या जिते येथील उपकेंद्राच्या दुरुस्ती व देखभालीच्या कामांमुळे बंद करण्यात येणार असल्याने सिडकोचे हेटवणे जल शुद्धीकरण केंद्र बंद राहणार आहे. यामुळे द्रोणागिरी, उलवे, खारघर नोडसह हेटवणे जलवाहिनीद्वारे पाणी पुरवठा करण्यात येणाऱ्या गावांचा पाणी पुरवठा शुक्रवार, २५ फेब्रुवारी २०२२ सकाळी १०.०० वाजेपासून ते शनिवार, २६ फेब्रुवारी २०२२ सकाळी १०.०० वाजेपर्यंत बंद राहणार आहे.

तरी संबंधित नोड आणि गावांतील नागरिकांनी पाणी साठवण्याची योग्य ती व्यवस्था करावी व सदर कालावधी दरम्यान पाण्याचा जपून वापर करावा, असे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आले आहे.

# खोपोली नगर परिषदेचे ‘तारीख पे तारीख’

### विभाग प्रमुख सुट्टीवर गेल्याने नगर परिषदेचे काम थांबले!

**दै.रायगड नगरी । खोपोली**



पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांचे कार्यालय जेवढे व्यस्त नाहीत, त्यापेक्षा जास्त व्यस्त खोपोली नगर परिषद कार्यालय असल्याचे दिसून येत आहे. गेली दोन वर्ष पाठपुरावा करुन आणि वारंवार स्मरणपत्र देवूनही अर्जदाराला साधे उत्तर देण्याचे काम खोपोली नगर परिषद प्रशासनाला जमत नसल्याचे दिसून येत आहे. ऐवढेच नव्हे तर शब्द देवून तो न पाळता ’तारीख पे तारीख’ देत वेळकाढूपणाची भूमिका घेत असल्याचे दिसते.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, आम्ही खोपोलीकर आमचं ठरलंय या संघटनेने दि. १४ फेब्रुवारी २०२२ रोजी महेश काजळे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन केले होते. यावेळी खोप–ोली नगर परिषदेचे कार्यालयीन अधीक्षक गणेश साळवी व उप मुख्याधिकारी गौतम भगळे यांनी आंदोलनाच्या मुद्द्यावर दि. २० फेब्रुवारी रोजी वस्तुस्थिती दर्शक अहवाल देण्यात येईल, पण प्रत्यक्षात आंदोलनाच्या तिसऱ्या दिवशीच पुन्हा नवीन पत्रक आंदोलकांना देत माहिती देण्याची वेळ वाढवून घेण्यात आली. खोपोली नगर परिषद काही निवडक विभाग प्रमुखांच्या भरो–शावर सुरू असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे संबंधित अधिकारी सुट्टीवर गेल्यास शासकीय कामाला खिळ बसत असल्याचे खोपोली नगर परिषद उप मुख्याधिकारी भगळे यांच्या पत्राने स्पष्ट होत आहे. आम्ही खोपोलीकर आमचं ठरलंय या संघटनेला पाठविलेल्या पत्रात नमूद करण्यात आले आहे की, आपण दि. २८ डिसेंबर २०२१ च्या पत्रान्वये १५ मागण्या केलेल्या आहेत. याअनुषंगाने याबाबत केलेली कार्यवाही / करीत असलेली कार्यवाही याचा वस्तुस्थिती दर्शक अहवाल दि. २० फेब्रुवारी २०२२ पर्यंत आपल्याला लेखी स्वरुपात देण्याबाबत दि. १४ फेब्रुवारी २०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. परंतु बरेचसे विभागप्रमुख रजेवर असल्याने व शिवजयंती कार्यक्रम असल्यामुळे सदर माहिती देण्यास विलंब होत आहे. तरी आपल्या १५ मागण्यांबाबत केलेली कार्यवाही / करीत असलेली कार्यवाही याचा वस्तुस्थिती दर्शक अहवाल दि. २५ फेब्रुवारी २०२२ पर्यंत आपल्याला लेखी स्वरुपात देण्यात येईल, असे नमूद करण्यात आले आहे. खोपोली नगर परिषद हद्दीत होत असलेल्या अनधिकृत बांधकामाची यादी, सर्वे नंबर व विकासकांच्या नावासह त्यांची माहिती स्वतंत्ररीत्या संकेतस्थळावर तसेच वर्तमानपत्रात प्रसिद्ध करण्याचे दुय्यम निबंधक यांच्याकडे देण्याचा स्पष्ट उल्लेख असताना सुध्दा अजुन त्याबाबत निर्णय नाही खोपोलीकर जे पाणी पीत आहेत त्याचे जे स्तोत्र आहे शंकर मंदिर तलाव त्यामध्ये सेप्टिक टँकचे जे पाणी येत आहे त्यावर लवकरात लवकर उपाययोजना करण्यात याव्यात खोपोली नगर परिषद हद्दीत आता झालेले रस्ते यांची दुरावस्था झाली असून त्याची सखोल चौकशी करून ठेकेदारांचे बिल न काढता पुन्हा त्याच वर्क ऑर्डर, करारनामा त्याच पैशातून संपूर्ण काम महाराष्ट्र शासन परिपत्रक प्रमाणे दर्जेदार करून घेण्यात यावे. खोपोली नगरपरिषदेचे नाट्यगृह याची जी दुरवस्था झाली आहे, त्याची तात्काळ दुरुस्ती व सुधारणा करून नाट्यप्रयोग, सभा व इतर कामासाठी ते उपयोगात आणावेखोपोली नगर परिषद डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयामध्ये कंत्राटी, करारनामा बेसेसवर डॉक्टर बाहेरून येणारे व्हिजींटग डॉक्टर, एक्स–रे मशीन, मनुष्यबळ पुरवठा (सिस्टर, कमाऊंटर, वॉर्ड बॉय व इतर) यासंबंधी व इतर जे जे वेगवेगळे ठराव, करारनामा, वर्क ऑर्डर आहेत त्याची माहिती अवलोकन प्रत देण्यात यावी. खोपोली नगर परिषद हॉस्पिटलमध्ये सोई, सुविधा व इतर हॉस्पिटल तसेच मदत करणाऱ्या संस्था यांची माहिती फलकावर लावावी शहरातील अनेक भागात धनदांडग्यांनी केलेल्या बेकायदेशीर बांधकामांना बेकायदेशीर बांधकाम शास्ती लावणेबाबत खालची खोपोली येथे खोपोली नगरपरिषद जागेत भाडेतत्त्वावर दिलेल्या एस्सार पेट्रोल पंपाबाबत करारनामा तसेच किती भाडे जमा झाले ह्याची माहिती उपलब्ध करावी.

## गुरुवारी पनवेलमध्ये ’मेरी आवाज हि पहचान है’ सुमधुर गाण्यांचा कार्यक्रम

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भारतरत्न लता मंगेशकर यांच्या सुरेल आणि सोनेरी आठवणींना उज–ाळा देण्यासाठी पनवेलमध्ये गुरुवार दिनांक २४ फेब्रुवारी रोजी रात्री ०८ वाजता शहरातील आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात ’मेरी आवाज हि पहचान है’ या सुमधुर गाण्यांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.



श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा, भारत विकास परिषद, रंगनिल संस्था, रंगरचना कलामंच, संस्कार भारती पनवेल समिती आणि पनवेल कल्चरल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून सामगंध कलाकेंद्र पनवेल हे सादरकर्ते आहेत. या कार्यक्रमाचा लाभ घेण्यासाठी मोफत प्रवेशिका अमोल स्टेशनरी, टिळक रॉड पनवेल (संपर्क क्रमांक ९८२०२३३३४९) येथे उप–लब्ध करण्यात आले आहे.

## शेकडो महिलांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश

### शिवसेना जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्या नेतृत्वावर ठेवला विश्वास



**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्व.बाळासाहेब ठाकरे यांनी सुरू केलेल्या शिव–सेनेचा मुख्य उद्देश आणि महत्त्व हे प्रत्येक पिढीतील तरुणाईच्या लक्षात येणं गरजेचे असल्यामुळे शिवसेनेच्या वतीने नेहमीच स्तुत्य उपक्रम राबविण्यात येत असतात. असाच एक उपक्रम पनवेल तालुक्यातील आदई येथे राबविण्यात आलेल्या हळदीकुंकू कार्यक्रमात आला. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्या नेतृत्वाखाली आणि पनवेल तालुका संपर्क प्रमुख योगेश तांडेल यांच्या सहकार्याने याठिकाणी महिलांचा सन्मान त्यांचे कुंकू ही संकल्पना समोर ठेवून हळदीकुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे आयोजन आदई येथील शिवसेनेचे माजी शाखाप्रमुख तथा नवीन पनवेल उपशहर प्रमुख ज्ञानेश्वर भंडारी यांनी केले होते. कार्यक्रमाची संकल्पना आणि आयोजनाने येथील महिला वर्गामध्ये समाधानकारक स्थिती झाल्याने त्यांनी या कार्यक्रमाच्या निमित्ताने शिव–सेनेत जाहीर प्रवेश केला. यावेळी काव्या सुतार या चार वर्षीय मुलीने छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना व प्रतिज्ञा घोषणा दिली ही बाब या कार्यक्रमाचे आकर्षण ठरले.

हळदीकुंकू हा महिलांचा मान आणि सन्मान, अनेक राजकीय पक्ष, सामाजिक संस्था आणि वैयक्तिक पातळीवर हळदीकुंकू समारंभ आयोजित केले जातात. यामध्ये काहीजण हळदीकुंकू सारख्या पवित्र समारंभाचे राजकीय भांडवल बनवितात. मात्र मुंबईच्या महापौर व रायगड जिल्हा संपर्क संघटिका सौ.किशोरीताई पेडणेकर व शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड पनवेल शिरीष घरत यांच्या मार्गदर्शनाने सदर कार्यक्रमाचे उचित भान ठेवून महिलांचा सन्मान हाच शिवसेनेचा अभिमान असल्याचे ब्रीद समोर ठेवले. आणि सदर कार्यक्रमाचे आयोजन केले. या वरिष्ठ नेत्यांच्या अनमोल नेतृत्वाखाली तसेच पनवेल तालुका संपर्क प्रमुख योगेश तांडेल यांच्या विशेष सहकार्याने नविन पनवेल उपशहर प्रमुख ज्ञानेश्वर भंडारी यांच्या प्रत्यनातून या सन्मानित कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी आदई गाव येथे शिवसेनेचा हळदी कुंकू समारंभ कार्यक्रम उत्साहात पार पडला. सदर कार्यक्रमाचे आयोजन आदई येथील शिवसेनेच्या शाखा सांघटिका सौ.नम्रता शिंदे आदई उपशाखा सांघटिका सौ.मंगल नाडार व सौ.करिश्मा भंडारी यांनी केले होते.

यावेळी शिवसेनेच्या वतीने आयोजन करण्यात आलेल्या हळदीकुंकू समारंभामध्ये प्रेरित होऊन आदई येथील महिलांनी मान्यवरांच्या उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. यावेळी रायगड जिल्हा संघटिका सौ.रेखाताई ठाकरे, रायगड उपजिल्हा संघटिका सौ. कल्पनाताई पाटील, पनवेल विधानसभा संघटीका सौ. रेवती सकपाळ, पनवेल तालुका संघटिका सौ.सुजाता कदम, पनवेल उपतालूका संघटिका सौ.टीया आरोरा, उपमहानगर संघटिका सौ.संचिता राणे, नविन पनवेल शहर संघटिका सौ.अपूर्वा प्रभु, नविन पनवेल उपशहर संघटिका सौ.सुगंधा शिदे, नविन पनवेल शहर संघटक जगदीश शेलके, नविन पनवेल शहर प्रमुख यतिन देशमुख, खांदेश्वर महिला पोलीस निरीक्षक सौ.वैशाली गलांडे, रॉयल ईग्लिंश स्कुलच्या प्रिन्सिपल सौ.नाजनीन पालेकर, नविन पनवेल सौ.सेजल खडकबान सतिश गायकर, अविनाश गव्हाणकर, सिद्देश गुरव आदी प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत आदई येथील प्रतिभा घोगावकर, लीलाबाई क्षीरसागर, जयश्री साळवे, सुजाता गुडेकर, प्राजक्ता कुरघुडकर, सुनंदा क्षीरसागर, अजिता पिल्लई, गीतांजली यादव, विमा शर्मा, श्रध्दा कोळी, कोमल पवळे, ललिता जाधव, निता क्षीरस–ागर, सोना चौहान आदींसह महिलांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

## प्रशासनाने किल्ले सुधागड येथे स्वच्छता मोहिमेच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज जयंती केली साजरी



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार आणि जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार किल्ले सुधागड येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती सुधागड किल्ल्यावरील स्वच्छता मोहिमेच्या माध्यमातून साजरी करण्यात आली. सुरुवातीला किल्ले सुधागड च्या पायथ्याशी दर्यागाव ठाकरवाडी येथे शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले, यावेळी स्थानिक सरपंच व पदाधिकारी उपस्थित होते, सोबत उपसचिव डॉ.नामदेव भोसले, प्रांताधिकारी डॉ.यशवंतराव माने, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) सर्जेराव म्हस्के–पाटील, उपविभागीय पोलिस अधिकारी किरणकुमार सूर्यवंशी, तहसिलदार दिलीप रायण्णावार, रायगड जिल्हा परिषदेचे वित्त व लेखाधिकारी श्री.कोळपे, गट विकास अधिकारी सुधागड विजय यादव, कृषी अधिकारी अशोक महामुनी तसेच पिंपरी–चिंचवड महानगरपालिकेकडून आलेले अभियंते व सुधागड मधील सर्व विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. त्यानंतर किल्ले सुधागड वर चढाई करण्यात आली. तेथे बा रायगडचे जवळजवळ ३०० सदस्य उपस्थित होते. प्रथम शिवजयंती साजरी करण्यात आली. त्यानंतर रायगड जिल्हाधिकारी कार्यालय, पुरातत्त्व विभाग, बा रायगड व स्थानिक प्रशासन असे मिळून सुधागड ची साफसफाई करण्यात आली. दि.२१ फेब्रुवारी रोजी एन.एस.एस.चे विद्यार्थी व बा रायगडचे सदस्य संपूर्ण सुधागड किल्ला पुन्हा एकदा साफसफाई करणार आहेत. किल्ल्यावरील साठलेला सर्व प्लास्टिकयुक्त कचरा हा ग्रामपंचायत सिद्धेश्वर यांच्या माध्यमातून पुर्नवापरासाठी प्रोसेसिंग युनिटकडे पाठविण्यात येणार आहे.

## पोलादपूर नगरपंचायतीनंतर आता लक्ष जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीकडे

### शिवसेना, कॉँग्रेस व राष्ट्रवादीचे कार्यकर्ते उड्डाणाच्या पवित्र्यात

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

नगरपंचायत पोलादपूरच्या निकालानंतर शिव–सेनेची सत्ता कायम राहिली असल्याकडे लक्ष ठेऊन असणारे सवंग राजकारणी सत्तेचा लाभ घेण्याच्या प्रयत्नात निष्ठावंत होऊन राहण्याच्या मानसिकतेत असताना त्याच निवडणुकीत सत्ताधाऱ्यांच्या विरो–धातील मतदानाची आकडेवारी कमालीची वाढल्याने ग्रामीण भागातही याचा फटका बसेल म्हणून राजकीय उड्डाणाच्या तयारीत दिसून येत आहेत. दुसरीकडे कॉँग्रेसपक्षाकडून स्व.माणिकराव जगताप यांच्या पश्चात अपेक्षित यश व साथ मिळत नसल्याने कॉँग्रेसचेही कार्यकर्ते राजकीय उडी मारण्याच्या पवित्र्यात दिसून येत आहेत. संख्याबहुल समाजाला नेतृत्व नाकारले जात असल्याच्या अनुभवातून राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनादेखील पंख फुटले असून कार्यकर्ते शक्यतो पक्ष सोडून जात नसल्याची परंपरा असलेल्या शेतकरी कामगार पक्षाने यावेळी निवडणुकीसाठी काडीमोड करून नवीन घरोबा करण्याची मानसिकता बाळगल्याचे दिसून येत आहे.

पोलादपूर तालुक्यात पंचायत समितीचे चार गण आणि जिल्हा परिषदेचे दोन गट म्हणजे मतदार संघ अस्तित्वात असून पनवेल महानगरपालिका निर्मिती आणि पोलादपूर नगरपंचायतीची निर्मिती या पार्श्वभुम ीवर तयार झालेल्या प्रारूप आराखड्यामध्ये लोहारे ५९ हा रायगड जिल्हा परिषदेचा नवीन गट तयार झाला. या गटामध्ये पार्ले, लोहारे, चरई, तुर्भे बुद्रुक, तुर्भे खुर्द, तुर्भे खोंडा, वझरवाडी, दिवील, काटेतळी, सडवली, कोंढवी, कोतवाल बुद्रुक, कोतवाल खुर्द, महालगुर, ओंबळी, पैठण, कुडपण बुद्रुक, परसुले, पांगळोली, भोगाव खुर्द, महाळुंगे, मोरगिरी, धामणदिवी, देवपूर, पळचिल, गोळेगणी यासोबतच पूर्वी देवळे जि.प. गटामध्ये असलेला सवाद गावाचा परिसर समाविष्ठ करण्यात आला आहे. या गटांतर्गत पोलादपूर पंचायत समितीचे लोहारे ११७ हा पंचायत समितीचा नव्याने तयार झालेला गण असून यामध्ये पूर्वीच्या देवळे गणातील सवाद तसेच पार्ले, लोहारे, चरई, तुर्भे बुद्रुक, तुर्भे खुर्द, तुर्भे खोंडा, वझरवाडी आणि दिवील या गावांचा समावेश आहे. लोहारे गटांतर्गत कोंढवी ११८ हा पंचायत समितीचा गण असून यामध्ये काटेतळी, सडवली, कोंढवी, महाल–गुर, ओंबळी, कोतवाल बुद्रुक, कोतवाल खुर्द, पैठण, कुडपण बुद्रुक, परसुले, पांगळोली, भोगाव खुर्द, महाळुंगे, मोरगिरी, धामणदिवी, देवपूर, पळचिल, गोळेगणी या गावांचा समावेश आहे.

देवळे ५८ या रायगड जिल्हा परिषदेच्या गट आहे. या गटामध्ये गोवेले, उमरठ, धारवली, कालवली, मोरसडे, बोरघर, आडावळे बुद्रुक, बोरा–वळे, माटवण, देवळे, वाकण, कापडे बुद्रुक, कापडे खुर्द, चांभारगणी बुद्रुक आणि बोरज या गावांचा समावेश आहे. या अंतर्गत पंचायत समितीच्या गोवेले ११५ गणात गोवेले, उमरठ, धारवली, कालवली, मोरसडे, बोरघर, आडावळे बुद्रुक, माटवण, बोरावळे या गावांचा समावेश आहे. देवळे ५८ या जिल्हा परिषद गटांतर्गत देवळे ११६ या पंचायत समिती गण आहे. या गणात देवळे, वाकण, कापडे बुद्रुक, कापडे खुर्द, चांभारगणी बुद्रुक, बोरज या गावांचा समावेश आहे.

पोलादपूर तालुक्यात गेल्या वर्षभरातील राजकीय घडामोडींमध्ये नेतृत्वाच्या भुमिकेकडे राजकीय पक्षसंघटनेचे बारकाईने लक्ष वेधले असून नेतेमंडळी लोकप्रतिनिधींसोबत हिरिरीने सहभागी झालेले दिसून येत असल्याचे दिसून आले आहे. शेकापक्षाने गेल्यावेळीच्या भुमिकेत काहिसा बदल केला असून यावेळी नवीन घरोबा घेण्याआधी कोणत्या मुद्द्यावर काडीमोड केला जाईल, हे स्पष्ट झाले नसले तरीद–ेखील लोकप्रतिनिधींसोबत तसेच ज्यांच्याविरोधात मागील निवडणुक लढले त्यांच्यासोबतची सलगी सर्वच पक्षियांचे लक्ष वेधून घेणारी ठरली आहे. कॉँग्रेसला माजी आमदार स्व.माणिकराव जगताप यांच्या पश्चात नगरपंचायत पोलादपूरची निवडणूक जिंकता आली नसली तरी पराभवाचे कारण कॉँग्रेस स्वतःच असल्याचेही स्पष्ट झाले आहे.

शिवसेनेने नगरपंचायत हद्दीत जेवढा आकडा प्रत्येक मताला मोजला तेवढा आकडा जिल्हा परिषद गट आणि पंचायत समिती गणातील ग्रामपंचायत हद्दीतील मतदारांना मोजला जाणार आहे काय, याम ुळे धास्तावलेल्या शिवसेनेच्या प्रमुख कार्यकर्त्यांनी कोटीच्या कोटी उड्डाणे झेपावण्याची तयारी सुरू केली असली तरी उड्डाणानंतर कोठे स्थिर व्ह–ावे अन् त्या कार्यकर्त्यांना पोलादपूर तालुक्यातील ग्रामीण मतदारांची मागणी पूर्ण करता येईल, अथवा कसे, याबाबत साशंकता निर्माण झाली आहे. या सगळ्यांमध्ये तालुक्यात छोटासा पक्ष असलेल्या राष्ट्रवादी कॉँग्रेसमध्ये तालुक्याचे नेतृत्व कोणी करायचे अथवा कोणी नाही करायचे, असे पेल्यातले वाद सतत लावून काही पक्षांतर्गत कार्यकर्त्यांनी त्यांच्या आधीच्या प्रतिस्पर्ध्याला सोबत घेऊन त्याची ताकद वाढविल्याचा राग वेगवेगळ्या खेळ्यांतून व्यक्त केला आहे. यामुळे संख्याबहुल समाजाविरोधात पक्षांतर्गत खेळ्या होत असल्याचा राग व्यक्त होऊन पक्षफुटीची शक्यता निर्माण झाली आहे.

## पादचाऱ्याचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कंटेनरच्या धडकेने पादचाऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना मुंबई–पुणे एक्सप्रेस हायवेवर पुणेकडे जाणाऱ्या लेनवर आज पहाटे घडली आहे.

अन्वर हुसेन अब्दुज अजीज पठाण (५२) हे रस्ता ओलांडत असताना अज्ञात कंटेनरवरील चालकाने त्यांना धडक मारुन झालेल्या अपघातात ते गंभीररित्या जखमी होवून त्यांचा मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर सदर कंटेनर चालक वाहनासह पसार झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## देवदर्शनासाठी आलेला इसम बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील मानघर येथील श्री क्षेत्र अक्षयधाम मंदिर येथे देवदर्शनासाठी आलेला इसम बेपत्ता झाल्याने तो हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. बाळकृष्ण दिगंबर धोत्रे (३६) असे या इसमाचे नाव असून उंची ५ फुट ५ इंच, रंग गव्हाळ, डोक्यासमोरील भागाला टक्कल, कपाळावर उजव्या भुईच्यावर मोठा तिळ आहे. त्याच्या अगात पांढऱ्या रंगाचा शर्ट व त्यावर काळ्या रंगाचा जॅकेट व राखाडी रंगाची पॅन्ट घातलेली आहे. सोबत मोबाईल फोन आहे. त्याला मराठी भाषा अवगत आहे.